
ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स, व्ही.आय.पी.रोड, नांदेड
मो. 9422172572, 9850430189



सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

**बुद्ध पौर्णिमा**

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!

- संपादक


• वर्ष २४ वे • अंक १९५ • शुक्रवार दि.१ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


# जिल्ह्यातील सर्व घटकांच्या विकासासाठी सदैव कटिबध्द : पालकमंत्री अतुल सावे



## महाराष्ट्र स्थापनेचा ६७ वा स्थापना दिन उत्साहात साजरा

नांदेड/प्रतिनिधी-केंद्र व राज्य शासनाकडून समाजातील सर्व घटकांचा विचार करून विविध कल्याणकारी योजना राबविण्यावर नेहमीच भर आहे. यामध्ये प्रामुख्याने शेतकरी, रोजगार, आरोग्य यासह सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. विकसित भारत २०४७ अनुषंगाने वाटचाल करुन सर्वांगीण विकास व जनकल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिनानिमित्त आज नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते नांदेड येथील पोलीस कवायत मैदानावर सकाळी ८ वा. ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी खा.अशोकराव चव्हाण, महापौर कविता मुळे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर अन्य वरिष्ठ अधिकारी आणि ज्येष्ठ सन्माननीय नागरिक तसेच स्वातंत्र सैनिक व त्यांचे कुटुंबियांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. ध्वजवंदनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर पालकमंत्री अतुल सावे यांनी स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्या वारस पत्नींची भेट घेतली. पालकमंत्र्यांसोबत जिल्हाधिकारी यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.देशात जनगणना २०२७ चा पहिला टप्पा आजपासून सुरू झाला आहे. या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत स्व-गणना १ ते १५ मे २०२६ या कालावधीत होणार असून, घरांची नोंदणी १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान केली जाणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महत्त्वाच्या अभियानात सहभागी होऊन आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

यावेळी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार नागेश देवराव कँक्काळ, नागरी हक्क संरक्षण विभागाचे लिंगुराम बळीराम पोकलवार व महिला पोलीस शिपाई जयश्री विठ्ठल मुरकुटे यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयाकडून निवड झालेले आदर्श ग्राम महसूल अधिकारी माधव कोंडजी पाटील यांना ५ हजार रुपयांचा धनादेश व प्रशस्तीपत्र देवून सन्मान केला. महिला व बाल कल्याण क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या समाजसेविकांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जिल्हास्तरीय पुरस्कार सुरेखा किनगावकर, अर्चना झाडबुके यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. जिल्हास्तरीय युवक-युवती पुरस्कार लवकुश मधुकर जाधव व साधना कैलास गायकवाड यांना प्रत्येकी १० हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रविंद्र पांडागळे व श्रीमती अंजली नातु यांनी केले.

जिल्हा पोलीस दलाच्या बँड पथकाने सुरवातीला वंदे मातरम गीताचे व राष्ट्रगीतासह राज्यगीत सादर केले. यावेळी राष्ट्रध्वजास मानवंदना व राष्ट्रगीतानंतर पान ४ वर

## २ कोटी ८४ लाख रुपयांच्या शासकीय निधी अपहार प्रकरणी वाजेगावच्या सरपंचास अटक

नांदेड/प्रतिनिधी-शासनाच्या विविध योजनेतील २ कोटी ८४ लाख रुपयांच्या निधीचा अपहार केल्या प्रकरणी वाजेगावचे सरपंच शेख जमील अहेमद व अन्य दोन ग्रामसेवकाविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसांनी सरपंच शेख जमील यांना अटक केली.

गेल्या सोळा वर्षांपासून वाजेगाव ग्राम पंचायतीचे सरपंच पद शेख जमील अहेमद यांच्याकडे आहे. त्यांनी सरपंच पदावर राहून ग्रामसेवकांच्या मदतीने शासकीय निधीचा गैरवापर व अपहार केला आहे. या संदर्भात पत्रकार लतिफखान पठाण यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली. या तक्रारीवरुनच पोलीसांनी सदरची कारवाई केली आहे. पत्रकार लतिफखान पठाण यांनी तक्रारीत म्हटले आहे की, सरपंच शेख जमील अहेमद हे २०१० पासून वाजेगाव ग्राम पंचायतीच्या सरपंच पदावर कार्यरत आहेत. २०१६ साली एक महिला मयत झाली असतांनाही तीच्या नावाने १२ हजार रुपये ग्रामपंचायतीच्या खात्यातून उचलण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीच्या डीसीबी बँकेतून वेळोवेळी स्वतःच्या नावाने रक्कम ग्रामसेवकाच्या मदतीने उचलली आहे. तसेच रोजंदारीने काम करणाऱ्या शेख हनीफ यांच्या नावाने १४ लाख रुपये धनादेशाच्या साह्याने वटवून सदरील निधी दलित वस्ती सुधारणेच्या नावे वापरल्याचे दाखविले. तरी त्याचा कोणताही लेखा-जोखा नाही. हा सगळा व्यवहार तत्कालिन ग्रामसेवक एस.एस.बोथीकर व ग्रामसेवक एस.एस.देशमुख यांच्या संगनमताने झालेला आहे. या प्रकरणी जि.प.कडे तक्रार करण्यात आली होती. विस्तार अधिकारी डी.एस.बचाव यांनी सदरील प्रकरणाची चौकशी करुन अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिला. सदरील अहवालात सरपंच शेख जमील अहेमद व ग्रामसेवकांनी २ कोटी ८४ लाख रुपयांचा शासकीय निधीचा अपहार केल्याचे म्हटले आहे. सदरील निधी त्यांच्याकडून वसुल करुन त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे अहवालात म्हटले होते. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सरपंच शेख जमील अहेमद यांना अटक करुन न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना ४ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. दोन ग्रामसेवक फरार असून त्याचा पोलीस शोध घेत आहेत.

## राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील १२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल शनिवार २ मे रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक बोर्डाकडून जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर, विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजता ऑनलाईन वेबसाटईवर पाहाता येणार आहे. काही दिवसांपूर्वी सीबीएसई बोर्डाचा निकाल जाहीर झाला होता. त्यानंतर, राज्यातील १२ बोर्ड परिक्षेच्या निकालाच्या तारखेकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारीमार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल शनिवार, दिनांक २ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे. सदर निकाल अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यार्थ्यांनी आपला आसन क्रमांक व इतर आवश्यक तपशीलांच्या आधारे निकाल पाहता येईल. यासंदर्भात अधिक माहिती देण्यासाठी शनिवार, २ मे रोजी सकाळी ११ वाजता राज्य मंडळाच्या कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. बारावीचा निकाल शनिवारी जाहीर होणार असून सकाळी ११ वाजता बोर्डाची पत्रकार परिषद होणार आहे. त्यामध्ये, राज्याचा निकाल, कोणत्या विभागात किती निकाला आणि एकूण विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने निकाला जाहीर होईल. त्यानंतर, दुपारी १ वाजता विद्यार्थ्यांना ऑनलाइन निकाल पाहता येणार आहे.

## माजी आ.सुरेशकुमार जेथलिया यांचे निधन

जालना: उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि माजी आ. सुरेशकुमार जेथलिया यांचे झोपेतच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. पहाटे ५ वाजताच्या सुमारास परतूर येथील निवासस्थानी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. जेथलिया यांच्या निधनाची बातमी समजताच परतूर-मंठा मतदारसंघासह संपूर्ण जालना जिल्ह्यात शोककळा पसरली असून कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.



सुरेशकुमार जेथलिया हे परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातील एक प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. आमदार म्हणून कार्यरत असताना त्यांनी मतदारसंघातील विविध विकासकामांवर मोठ्या प्रमाणात भर दिला. रस्ते, पाणीपुरवठा, नागरी सुविधा तसेच ग्रामीण भागातील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यासाठी त्यांनी आपल्या राजकीय प्रभावाचा वापर करत अनेक विकासकामे मार्गी लावली. सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणारे, त्यांच्या अडचणी समजून घेणारे आणि प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधणारे नेतृत्व म्हणून सुरेशकुमार जेथलिया यांची वेगळी ओळख होती. कार्यकर्त्यांमध्ये त्यांची मजबूत पकड होती.

## पिक विमा तात्काळ द्या;अन्यथा तीव्र आंदोलनाचा शेतकऱ्यांचा इशारा

धर्माबाद/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांच्या विमा रकमेचा तात्काळ वाटप करण्यात यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हा शेतकरी जनआंदोलन संघर्ष समितीने राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

समितीच्या वतीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सन २०२४-२५ मध्ये नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांनी पिक विम्यासाठी अर्ज केले असले तरी विविध तांत्रिक कारणांमुळे अद्यापही अनेकांना विमा रक्कम मिळालेली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिरजखोड, घुंगराळा, धर्माबाद, बरबडा तसेच इतर मंडळांतील शेतकऱ्यांना तात्काळ खरीप पिक विमा वाटप करण्याचे आदेश द्यावेत, पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज



जाहीर करावे, तसेच २०१९ च्या नियमांनुसार विमा न मिळालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय खरीप हंगाम २०२३-२४ व रब्बी हंगाम २०२४-२५ मधील प्रलंबित विमा दावे तात्काळ निकाली काढावेत, विमा कंपन्यांनी नाकारलेल्या सुमारे पाच लाख शेतकऱ्यांच्या पान ४ वर

## महाराष्ट्र दिनानिमित्त महापालिकेत कविता मुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

नांदेड/प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६७ वा वर्धापन दिन आज सकाळी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. यावेळी महापौर सौ. कविता संतोष मुळे यांच्या हस्ते महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी पालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी वंदे मातरम गीताने समारंभाची सुरुवात करून ध्वजारोहण करण्यात आले, ध्वजारोहण संपन्न झाल्यावर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी सामूहिक राष्ट्रगीत व महाराष्ट्र राज्य गीताचे गायन केले तसेच पोलीस दलाने व अग्निशमन दलाने झेंड्यास सलामी दिली. ध्वजारोहणानंतर महापौरांनी महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचे स्मरण करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला. त्याचप्रमाणे महापौर व पालिका आयुक्तांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या सोहळयाला उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग



गाडीवाले, सभागृह नेता महेश कनकदंडे, गटनेता प्रशांत इंगोले, माजी सभापती किशोर स्वामी, माजी महापौर शैलजा स्वामी, माजी उपमहापौर अ. गफ्फार अ.सत्तार, महानगरपालिकेच्या विविध प्रभागाचे नगरसेवक, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त तसेच सर्व विभागांचे विभागप्रमुख आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहूर तालुक्यातील इंग्रजी शाळांवर कारवाईची मागणी

माहूर/प्रतिनिधी-तामिळनाडूतील कुंभकोणम येथे घडलेल्या दुर्घटनेनंतर सर्वोच्च न्यायालय यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत दिलेल्या स्पष्ट आदेशांची अंमलबजावणी देशभर करणे बंधनकारक असताना, माहूर तालुक्यातील अनेक इंग्रजी शाळांमध्ये या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते विनोद विश्वनाथ सूर्यवंशी यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी संबंधित प्रशासनाला निवेदन सादर करून तातडीने चौकशी व कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, माहूर शहरातील ७ शाळा तसेच वाई बाजार येथील ४ शाळांसह तालुक्यातील काही नोंदणी नसलेल्या इंग्रजी शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. इमारती राष्ट्रीय मानकांनुसार नसून, अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन निर्गमन मार्ग, तसेच आग विझवण्यासाठी आवश्यक पाणी साठा यांचा अभाव असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे.तसेच जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत शिक्षणाधिकाऱ्यांनी २००९ मध्ये दिलेले विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबतचे २० महत्त्वाचे निर्देशही अंमलात आणले गेले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आदेशांची अंमलबजावणी संबंधित विभागांनी दुर्लक्षित केल्याचेही निवेदनात नमूद आहे.विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देताना संबंधित यंत्रणांकडून बोगस प्रमाणपत्रे दिली जात असल्याचा आरोप करत, अशा अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्या पान ४ वर

# गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान

वैशाख महिन्यातील पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत अत्यंत पवित्र, चिंतनशील आणि मूल्यप्रधान मानला जातो. याच दिवशी मानवजातीला करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीनही महत्त्वपूर्ण प्रसंग घडल्याची परंपरा आहे. त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुज्जीवन करणारा, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत, जिथे माणूस भौतिक प्रगतीच्या मागे धावताना मानसिक शांतता, नैतिकता आणि सामाजिक समतेपासून दूर जात आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान अधिकच सुसंगत आणि आवश्यक ठरते.

गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व सहाव्या शतकात लुंबिनी येथे शाक्यकुलात झाला. त्यांचे बालनाव सिद्धार्थ होते. राजघराण्यातील ऐश्वर्यपूर्ण वातावरणात त्यांचे बालपण गेले, परंतु त्यांच्या संवेदनशील मनाला जीवनातील दुःखाचे वास्तव सतत अस्वस्थ करत होते. वृद्धत्व, रोग आणि मृत्यू या अपरिहार्य सत्यांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनात जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. जीवन दुःखमय का आहे? आणि या दुःखातून मुक्तीचा मार्ग कोणता? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलेली एक महान साधना होती. ज्ञानाच्या शोधात त्यांनी विविध गुरूंकडून शिक्षण घेतले, कठोर तपश्चर्या केली, परंतु त्यांना अपेक्षित समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी अतिभोग आणि अतितप या दोन्ही टोकांच्या मार्गांचा त्याग करून मध्यम मार्ग स्वीकारला. बोधीवृक्षाखाली गहन ध्यानसाधना करून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते बुद्ध म्हणजेच जागृत झाले. या ज्ञानप्राप्तीने त्यांनी मानवी जीवनाचे सत्य उलगडले आणि दुःखातून मुक्तीचा मार्ग दाखवला.

बुद्धांचे तत्त्वज्ञान मूलतः मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अनुभव, विवेक आणि आचरण यांना महत्त्व दिले. त्यांच्या शिकवणीत मनुष्य स्वतःच्या कर्माचा निर्माता आहे आणि त्याच्या कृतींवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, ही स्पष्ट भूमिका दिसते. हा दृष्टिकोन माणसाला स्वावलंबन, जबाबदारी आणि नैतिकतेची जाणीव करून देतो. गौतम बुद्धांनी मांडलेली चार आर्य सत्ये ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत आधाररचना आहे. जीवनात दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा अंत शक्य आहे आणि त्या अंताचा मार्ग आहेत ही चार सत्ये ती मानवी जीवनाचे वास्तव स्पष्ट करतात. बुद्धांनी दुःखाचे मूळ तृष्णा किंवा अनियंत्रित इच्छांमध्ये पाहिले आहे. ही तृष्णा माणसाला सतत असमाधानी ठेवते आणि दुःखाचे कारण बनते. म्हणूनच तृष्णेवर नियंत्रण मिळवणे आणि मनाला संतुलित ठेवणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे.

या दुःखातून मुक्त होण्यासाठी त्यांनी अष्टांगिक मार्ग सांगितला आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या आठ घटकांचा समावेश असलेला हा मार्ग व्यक्तीला नैतिकता, मानसिक शुद्धता आणि प्रज्ञेच्या दिशेने नेतो. हा मार्ग केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी नसून तो दैनंदिन जीवनातही अत्यंत उपयुक्त आहे. या मार्गाचा अवलंब केल्यास व्यक्तीच्या विचारांमध्ये स्पष्टता, वर्तनात संतुलन आणि जीवनात समाधान निर्माण होते. बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान सामाजिक समतेवर आधारित आहे. त्यांनी जात-पात, वर्णभेद आणि सामाजिक विषमता यांचा ठामपणे विरोध केला. त्यांच्या मते, माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर अवलंबून असते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता आणि आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींना दिशा देतो. त्यांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय हा मूलमंत्र दिला, जो सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो. स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी भिक्षुणी संघाची स्थापना करून स्त्रियांना धर्ममार्गावर समान स्थान दिले. त्या काळात स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जात असताना बुद्धांनी त्यांना समानतेची संधी उपलब्ध करून दिली. हा निर्णय केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता.बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री, सत्य आणि क्षमा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी कार्य करणे. करुणा हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक जीवामध्ये समानतेने पाहणे आणि त्याच्याशी सहानुभूतीने वागणे हीच खरी मानवता आहे. आजच्या आधुनिक युगात माणूस भौतिक प्रगतीच्या शर्यतीत इतका गुंतला आहे की त्याने मानसिक शांतता आणि नैतिक मूल्ये गमावली आहेत. ताणतणाव, नैराश्य, असंतोष आणि स्पर्धा यामुळे मानवी जीवन अधिकच क्लिष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे मध्यम मार्ग आणि संतुलित जीवन यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी सांगितलेला मार्ग संयम, सजगता आणि संतुलन यांचा आहे, जो व्यक्तीला अंतःशांती आणि समाधान देतो. पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे ही त्यांच्या शिकवणीची एक महत्त्वाची बाजू आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त ठरतो.



**डॉ.राजेंद्र बगाटे**

बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही स्पर्श करणारे आहे. त्यांनी मानवी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण यांविरुद्ध एक सुस्पष्ट आणि विवेकी भूमिका मांडली. त्यांच्या विचारांत माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि समानतेचा आग्रह दिसतो. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक चौकटीत न बसता व्यापक अर्थाने मानवतावादी आणि समाजपरिवर्तनवादी ठरते. त्यांच्या शिकवणीत कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा रूढीपरंपरांना स्थान नाही. त्यांनी तर्क, विवेक आणि अनुभव यांच्या आधारे जीवन जगण्याचा संदेश दिला.

आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या मूल्यांशीही बुद्धांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानात स्पष्टपणे दिसून येतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, तिच्या सन्मानाचे रक्षण व्हावे आणि ती स्वाभिमानाने जगू शकेल अशी व्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आजच्या काळात वाढती सामाजिक दरी, आर्थिक विषमता आणि अन्यायाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांचे विचार समाजाला अधिक न्याय्य आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. शिक्षणाच्या क्षेत्रातही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी ज्ञानाला केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता त्याचा उपयोग जीवन समजून घेण्यासाठी आणि आत्मविकासासाठी करावा, असा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. स्वतःच्या अनुभवातून सत्य जाणून घ्या ही त्यांची भूमिका आजच्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी असावे, ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या युगात तणाव, नैराश्य, चिंता आणि अस्थिरता या समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या संकल्पना अत्यंत प्रभावी ठरतात. सजगता (माइंडफुलनेस) आणि ध्यानसाधना यामुळे मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि व्यक्तीला आत्मिक समाधान मिळते. त्यामुळेच आजच्या आधुनिक मानसशास्त्रातही बुद्धांच्या ध्यानपद्धतीला विशेष महत्त्व दिले जाते. पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी सर्व जीवसृष्टीबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे, संसाधनांचा मर्यादित आणि जबाबदारीने वापर करणे आणि सर्व जीवांचे संरक्षण करणे ही त्यांची शिकवण आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत उपयुक्त ठरते. मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची गरज त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान जागतिक स्तरावरही प्रभावी ठरले आहे. आशियातील अनेक देशांनी त्यांच्या शिकवणीचा स्वीकार करून आपली सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था घडवली आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता आणि साधेपणा यामुळे ते सर्व स्तरांतील लोकांना समजण्यास आणि आचरणात आणण्यास सोपे वाटतात. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे एका विशिष्ट धर्मापुरते मर्यादित न राहता संपूर्ण मानवजातीसाठी उपयुक्त ठरते. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात, जिथे विविध संस्कृती, विचारप्रवाह आणि जीवनशैली एकत्र येत आहेत, तिथे सहिष्णुता, संवाद आणि परस्पर आदर या मूल्यांची आवश्यकता अधिकच वाढली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या सर्व मूल्यांना प्रोत्साहन देते. त्यांनी द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा आणि स्वार्थाऐवजी परोपकार यांचा पुरस्कार केला. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे जागतिक शांतता आणि सौहार्द निर्माण होण्यास मदत होऊ शकते. गौतम बुद्धांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ भूतकाळातील एक ऐतिहासिक घटना नसून ते आजच्या आणि भविष्यातील समाजासाठीही मार्गदर्शक आहे. त्यांच्या शिकवणीतून आपण केवळ वैयक्तिक जीवनातील समस्या सोडवू शकत नाही, तर समाजातील व्यापक प्रश्नांनाही सामोरे जाऊ शकतो. त्यांनी दिलेला मध्यम मार्ग हा अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे, जो आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे. वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसा या मूल्यांचा अंगीकार केल्यास आपण अधिक शांत, सुसंवादी आणि न्याय्य समाज निर्माण करू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनात आणि विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यासच खऱ्या अर्थाने बुद्धांचे तत्त्वज्ञान साकार होईल. आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताण, नैतिक अधःपतन, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय संकट. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ बाह्य उपाय पुरेसे नाहीत, तर अंतर्मुख होऊन स्वतःच्या विचारांमध्ये आणि वर्तनात बदल घडवणे आवश्यक आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या परिवर्तनासाठी एक प्रभावी मार्ग दाखवते. त्यांच्या शिकवणीतून आपण संयम, सजगता, सहानुभूती आणि विवेक या गुणांचा विकास करू शकतो.

शेवटी असे म्हणता येईल की गौतम बुद्ध यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वारसा आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता, साधेपणा आणि उपयुक्तता यामुळे ते काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत. वैशाख पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी आपण त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या या मार्गावर चालत आपण अधिक सुंदर, शांततापूर्ण आणि न्याय्य जग निर्माण करू शकतोहीच या दिनाची खरी शिकवण आहे.

# राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी; ''कामगार जाए तो जाए कहा?''




कामगारवर्ग हा भारताचाच नाही तर संपूर्ण ''जगाचा आधारस्तंभ'' आहे, परंतु तो दिवसेंदिवस ढासळतांना दिसत आहे. सरकार आणि राजकीय पुढारी स्वतःच्या स्वार्थासाठी लोकसभा सदस्य संख्या ५४३ वरून ८५० वर नेण्याच्या प्रयत्नात आहेत. परंतु कामगारांना (देशाचा शिल्पकार) पगार, पेन्शन, भत्ते, आरोग्य सुविधा देण्यात सरकार असमर्थ असल्याचे दिसून येते.दरवर्षी १ मे हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणुन साजरा केल्या जातो. आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दिसुन येतात.शेतीतील कामगार असो, कारखाण्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयना अवस्था दिसून येते. आज विकसीत, विकसनशील, गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जिवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे. आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो.भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते. म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वोतोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे.

आपल्या देशाचा विचार केला तर मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा ''शिल्पकार'' मानल्या जातो. तर शेतकरी हा ''अन्नदाता'' मानल्या जातो.यांची भुमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती, ताजमहाल, गुरूद्वारा, बौद्ध विहार,कुतुबमिनार,संसद भवन, अयोध्येतील राममंदिर मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज शिल्पकारचे हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते. कामगार हा जगाचा मोठा आधारस्तंभ आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगार वर्गामध्ये अशा अनेक अडचणी दीसुन येतात की त्यांचा उदरनिर्वाह होने अत्यंत कठीण झाले आहे.आपण जर भारतातील ईपीएस-च्या दिड करोड निवृत्त पेंशन धारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेन्शन मिळत आहे.पेंशन वाढण्याच्या आशेने निवृत्त पेंशन धारक मोठ्या आशेने सरकारकडे पहात होते.परंतु केंद्र सरकारने त्यांच्या मागणीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते. अल्पशा पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होवु शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जिवन-मरनाचा प्रश्न उपस्थित आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परीस्थिती आनखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दुःखी आणि चिंतेत दीसुन येतो. २०१९ ते २०२१ हे वर्ष संपुर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले.आजही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आहेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते.भारत हा शेतीप्रधान देश आहे त्याचप्रमाणे बहु लोकसंख्येचा देश आहे. कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो. त्यामुळे आता

**रमेश लांजेवार**
नागपूर.

समान कायदा, समान अधिकार समान संपत्ती, समान वेतन,समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एका कुटुंबाला रहाण्याकरीता कीती जागा असावी,एका कुटुंबाजवळ उदरनिर्वाह करण्याकरिता कीती संपत्ती असावी. यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे.कारण ही दुःखदायीबाब आहे की ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजि-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ आज अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती दीसून येईल. म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते. यामुळेच देशात महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या,शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्य सुविधा इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे राजकिय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा. तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दीलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरीबीच्या खाईत गुदमरून मरेल.करीता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल. भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे. देशातील दिड करोड ईपीएस-१९९५ पेंशन धारकांचा प्रश्न अजुनही रडखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी.एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल. परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढतांना दिसतात. सरकारने कामगारांच्या जखमेवर फुंकर घालावी. यालाच खरा कामगार दिवस समजल्या जाईल. कारण ''ज्या देशाचा कामगार सुखी तो देश सुखी'' हेही तितकेच सत्य आहे.सध्याच्या परीस्थितीत कामगार चळवळी संपुष्टात आल्या आहेत.त्यामुळे सरकारच कामगारांचे सर्वेसर्वा आहेत.अशा परीस्थितीत सरकारनेच कामगारांच्या प्रती योग्य पाउले उचलुन दिलासा दिला पाहिजे.कारण भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातील कामगार वर्ग अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा मोबदला त्यांना मिळायलाच पाहिजे.कारण कामगार हा जगाचा आधारस्तंभ आहे. या आधारस्तंभाला टिकवुन ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे. कामगारांच्या प्रती सहानुभूती, सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल.देशाचा राजकीय पुढारी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल. जगातील बदलते हवामान पहाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील.जय हिंद!

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन कामे करा-पालकमंत्री अतुल सावे




नांदेड/प्रतिनिधी-खरीप हंगाम सर्वांनी समन्वय ठेऊन यशस्वी करावा. आगामी हवामान आधारित परिस्थिती लक्षात घेऊन शेतकरी हिताला प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांना पाणी, वीज, खतांचा मुबलक साठा उपलब्ध होईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. कामात कसूर करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात 'खरीप हंगाम-२०२६' बैठक पार पडली. बैठकीस खा.अशोक चव्हाण, खा.रवींद्र चव्हाण, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.राजेश पवार, आ.बालाजी पाटील कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, आ.श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत आदी उपस्थित होते. पालकमंत्री सावे म्हणाले, बोगस बियाणे, खतांची साठेबाजी, पीक कर्ज देण्यात अडथळा आदी बाबत प्रशासनाने नियमानुसार कारवाई करावी. याबाबत कृषीशी संबंधित असलेल्या शासकीय, खासगी यंत्रणा यांच्याशी बैठक आयोजित करावी. तसेच महावितरण बाबत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत राज्यस्तरावर बैठकीचे आयोजन लवकरच करण्यात यईल, असेही पालकमंत्री म्हणाले.

खतांची साठेबाजी रोखण्यासाठी भरारी पथके नेमून यावर आळा घालण्याच्या सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या. अल निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना येत्या खरीप हंगामात मार्गदर्शन करावे. शेतकऱ्यांना सोलार पंप विहित वेळेत उपलब्ध करुन न देणाऱ्या कँम्न्यावर कारवाई करण्यात येईल, असेही निर्देश त्यांनी दिली.जिल्ह्यात सध्या खताचा मुबलक साठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील खताचा साठा इतर राज्यात जावू नये यासाठी भरारी पथके नेमली आहेत. खत उपलब्धतेसाठी क्युआर कोड केले आहेत. क्युआर कोडच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खताची उपलब्धतेची माहिती मिळेल. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा नियमित होण्यासाठी लवकरच शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

जिल्ह्यात अल निनोच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाच्यावतीने जिल्हा चारा आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणत्याही बाबीची अडचणी येणार नाहीत याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रत्येक ग्रामपंचायतीत पर्जन्यमापक यंत्र लावण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मिर्ची संशोधन केंद्र, सोयाबीन, केळी संशोधन केंद्राचे प्रस्ताव लवकरच शासनास सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नांदेड शहरात कृषी भवनासाठी जागा उपलब्ध करुन याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या निधनानंतर कृषी विभागाची ही पहिलीच बैठक होत असल्याने, बैठकीच्या सुरुवातीला पालकमंत्री सावे यांच्या उपस्थितीत दिवंगत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## खरीप हंगामातील पिक विम्याची उर्वरित रक्कम त्वरित अदा करा-खा.रवींद्र चव्हाण



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यातील मंडळनिहाय शिल्लक राहिलेल्या स.न. २०२५ मधील खरीप हंगामातील पिक विम्याची रक्कम त्वरित अदा करावी या मागणीचे निवेदन खा.रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे दिले आहे.

खा. चव्हाण यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, जिल्ह्यातील सन २०२५ मधील खरीप हंगामातील पिक विमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांना मिळणारी भरपाई अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. विविध मंडळांमध्ये पिक विम्याच्या रकमेचे वितरण अपूर्ण राहिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.सदर प्रकरणाची शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आपण या विषयावर तातडीने दखल घेऊन मंडळनिहाय शिल्लक राहिलेल्या खरीप हंगामातील पिक विम्याची रक्कम त्वरित अदा करण्यात यावी. तसेच संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावी, अशीही मागणी खासदार रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

## हदगावच्या बसस्थानकातून महिलेचे दागिणे लंपास

नांदेड/प्रतिनिधी-हदगावच्या बसस्थानकातून बसमध्ये चढत असतांना एका महिलेच्या पर्समधील दागिणे अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना गुरुवारी सकाळी घडली आहे.

शाळांना सुट्या व लग्नसराई असल्यामुळे एसटी महामंडळांच्या बसेसंना प्रवाशांची प्रचंड गर्दी आहे. गर्दीचाच फायदा आता चोरटे घेवू लागले आहेत. कवाना ता.हदगाव येथील खंडू किशन लकडे यांची पत्नी ह्या गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास गावाकडे जाण्यासाठी एसटी बसमध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेवून अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ६५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले आहेत. खंडू लकडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हदगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस जमादार भिसे हे करीत आहेत.

## दिल्लीत महिला साहित्य संमेलन; डॉ.शारदा चोंडेकरांच्या प्रतिभेची दखल

नांदेड/प्रतिनिधी-देशाची राजधानी नवी दिल्ली येथे दि. ११ व १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित पहिल्या अखिल भारतीय महिला शासकीय अधिकारी मराठी साहित्य संमेलनात नांदेड जिल्ह्याच्या डॉ. शारदा चोंडेकर यांनी आपल्या काव्यप्रतिभेने ठसा उमटवला. महाराष्ट्र सदनात पार पडलेल्या या संमेलनात विविध राज्यांतील महिला अधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदवला गेला. जागर कर्तृत्वाचा, उत्सव साहित्याचा या ब्रीदाखाली झालेल्या या उपक्रमात साहित्य आणि प्रशासन यांचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

किनवट सारख्या आदिवासी बहुल आणि दुर्गम भागात तहसीलदार म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. शारदा चोंडेकर या संमेलनाच्या निमंत्रित प्रतिनिधी होत्या. बहिणाबाई चौधरी सभागृहात त्यांनी सादर केलेल्या काव्यमय अभिव्यक्तीला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. त्यांच्या साहित्यकृतीतून उमटलेले संवेदनशील आणि सामाजिक भान असलेले विचार विशेष लक्षवेधी ठरले. त्यांच्या सहभागामुळे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व राष्ट्रीय स्तरावर ठळकपणे अधोरेखित झाले.या संमेलनात देशभरातील महिला शासकीय अधिकारी सहभागी झाल्या होत्या. प्रशासनात कार्यरत असलेल्या महिलांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देण्यासाठी या संमेलनाचे आयोजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात सरहद संस्था व नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त सचिव श्रीमती आर. विमला यांनी केले होते.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती व स्वच्छता दिनानिमित्त किनवट नगर परिषदेच्यावतीने एक कदम स्वच्छता की ओर अंतर्गत भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार यांनी स्वतः हातात झाडू घेवून या मोहिमेत सहभाग नोंदवीला. यावेळी मुख्याधिकारी मुगाजी काकडे, कार्यालयीन अधिक्षक अशोक भालेराव, करण एंड्रलवार, नगरसेविका अश्विनी जागर्लावार, नगरसेवक श्रीराम नेम्मानीवार, शेखर नेम्मानीवार, सुरज सातुरवार व इतर सहभागी झाले होते.

## एचटीबीटी कपाशी बियाणे साठवणूक,वाहतुक,विक्री विरोधात जिल्हाधिकाऱ्यांचे कडक निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-एचटीबीटी कापुस बियाणे विक्री, साठवणूक व वाहतुक या विरोधात प्रथम कायदेशीर कार्यवाही करुन पोलीसांनी गुन्हे दाखल करावेत. तसेच क्षेत्रीय स्तरावर जिल्हास्तरीय पथकामार्फत एचटीबीटी जिनची तपासणी करण्यात यावी. यामध्ये दोषी आढळणाऱ्यावर सक्त कार्यवाहीचे नर्दिश जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिले.

किडरोग सल्ला प्रकल्पाचे सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पाची पुर्नबांधनी करणे, देखरेख/दक्षता पथकाची स्थापना करणे, कपाशी पिकातील तण नियंत्रणाकरिता शेतकऱ्यांना लहान यंत्रे उपलब्ध करुन देणे व त्याचा प्रचार व प्रसार करणे, फिरते तपासणी किट उपलब्ध करुन देण्याबाबत नुकत्याच संपन्न झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सूचना केल्या.आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी कापाशी लागवडीची तयारी सुरू झाली आहे मात्र यासंधीचा फायदा घेत बाजारात अनधीकृत आणि बंदी असलेले एचटीबीटी बियाणे विक्रीची शक्यतानिर्माण झाली आहे. या पार्श्वभुमीवर नांदेड जिल्हयात जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, कृषि व पोलीस यंत्रणेच्या सहभागातुन एचटीबीटी कपाशी बियाणे संदर्भात जिल्हासमन्वय समति स्थापन करण्यात आली.अवैध कँम्न्याकडुन उत्पादनात वाढ व खर्चाच्या बचतीचे खोटे दावे करण्यात येतात. खरे तर या बियाणांमुळे जमीनीचा पोत बघिडु शकतो आणि पर्यावरणाला हाणी पोहचु शकते, त्यामुळे कोणत्याही कृषि विद्यापीठाने या बियाणाची शिफारस केली नाही. बिटी कपाशीमध्ये बोंडअळीला रोखण्याची क्षमता असते मात्र एचटीबीटी कपाशी बियाणामध्ये हर्बिसाइड टॉलरंट हाअतरीक्त जीन असतो यामुळे ग्लायफोसेट सारखे तणनाशक फवारल्यावर तण मरते पण कापुस जिवंतराहतो. वरकरणी हे फायदेशीर वाटत असले तरी याचे पर्यावरणावर गंभीर दुष्परीणाम होतात. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कापूस संशोधन केंद्राचे वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अरविंद पांडागळे, कृषि विकास अधिकारी निलकुमार ऐतवडे, मोहीम अधिकारी सचीन कपाळे, तालुकाकृर्षा अधिकारी नांदेड, मुदखेड, भोकर, माहुर, कँधार, उमरी व किनवट, जिल्हा गुणनयिंत्रण निरीक्षक अमोल पेकम, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे हे उपस्थित होते.

## मटका अड्डयावर एलसीबीची धाड

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील केळी मार्केट भागात सुरु असलेल्या मटका अड्डयावर गुरुवारी रात्री स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन सहा जणांना अटक केली आहे.

केळी मार्केट भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रोडवर मटका अड्डा खुलेआमपणे सुरु होता. गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी सदरील मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून टाइम बाजार नावाचा मटका खेळवीत असतांना दिलीप अमरचंद चौधरी (वय ३६) रा.होळी व इतर पाच जणांना पोलीसांनी रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून मटका घेण्याचे साहित्य व रोख रक्कम २८ हजार ७८० रुपये पोलीसांनी जप्त केले.

## जनगणना उपक्रमाच्या सेल्फी पॉईंटचे पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

नांदेड/प्रतिनिधी-देशात सुरू झालेल्या जनगणना-२०२७ च्या पहिल्या टप्प्याअंतर्गत आजपासून जनगणना स्व-गणना प्रक्रिया सुरू झाली आहे. या उपक्रमाची जनजागृती करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात सेल्फी पॉइंट तयार केला आहे. आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते सेल्फी मोहिमेचे उद्घाटन झाले. तसेच त्यांनी स्वतः स्वगणना केली.

या मोहिमेद्वारे नागरिकांनी स्व-गणना करताना सेल्फी काढून सहभाग नोंदवावा आणि इतरांनाही या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले. भारत सरकारतर्फे राबविण्यात येत असलेल्या जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यात १ ते १५ मे २०२६ कालावधीत स्व-गणना प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. याद्वारे सर्व नागरिकांनी आपल्या कुटुंबाची माहिती स्वतः ऑनलाईन पद्धतीने अधिकृत se.census. gov.in या संकेतस्थळावर भरता येणार आहे. तर १६ मे ते १४ जून २०२६ दरम्यान घरनोंदणी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महत्त्वपूर्ण अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून आपली जबाबदारी पार पाडावी, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

## कळगावच्या रोपवन योजनेत भ्रष्टाचार

उमरी/प्रतिनिधी-उमरी तालुक्यातील कळगाव येथे वनविभागाचे अधिकारी व वनरक्षक यांनी संगणमत करुन झाड न लावता खोटे मस्टर तयार करुन मजुर दाखवून तीस लाख रुपयांचे बील उचलून भ्रष्टाचार केल्याचा आरोप ग्रा.पं.सदस्य बालाजी पाटील डांगे यांनी केला आहे. उमरी तालुक्यातील कळगाव येथे वनविभागाचा भांडाफोड झाला असून पाच हेक्टर जमीनीवर वृक्षारोपण करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात एकही झाड जिवंत नाही. झाडे लावून कागदोपत्री काम पुर्ण केल्याचे दाखविले. प्रत्यक्षात वृक्ष संवर्धनाकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.


## कार्यालय नगरपरिषद,कंधार जि.नांदेड

जावक क्रं.: १०४२/२०२६ नगर परिषद कंधार,जिल्हा नांदेड, दिनांक : ३०/४/२०२६

### बांधकाम विभाग ई-निविदा सुचना

### क्र.(०१) सन २०२६-२७

कंधार नगरपरिषदेतर्फे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने मधून नगर परिषद, कंधार हद्दीतील सिमेंट रोड, नाली, सभागृह व संरक्षण भिंत एकुण ०६ कामे करणेकरिता ई निविदा मागविण्यात येत आहे, तरी इच्छुकांनी कामाकरिता निविदेत भाग घ्यावा.

- **नियम व अटी**

१. उपरोक्त योजनेतील निविदेचे वेळापत्रक आणि संपूर्ण तपशील दि.०१/०५/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता पासुन www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात आली आहे. तसेच निविदे संबधी या पुढील सर्व सुचना / शुद्धीपत्रक सदर संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात येईल.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
नगरपरिषद कंधार

CHANGE IN NAME

My (old name) is **ABDULLAH BALKHSHAR AKBAR BALKHASHAR** which now I am, changing as (new name) **ABDULLAH BALQASHAR ALJAEADI**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
5-1-144,Arab Galli,Jama Masjid
Nanded-431604
M No-7397850720

CHANGE IN NAME

My (old name) is **AKBAR BALKHASHAR** which now I am, changing as (new name) **AKBAR BALQUASHAR UMAR BALQUSHAR**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Address
5-1-144,Arab Galli,Jama Masjid
Nanded-431604
M No-7397850720

CHANGE IN NAME

My (old name) is **CHANDAK SANGITA KAILASH** which now I am, changing as (new name) **SANGEETA KAILASH CHANDAK**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SANGEETA KAILASH CHANDAK**
R/o H.no.1-16-407, near Damam corner
Gokulnagar Nanded-431602
M.No.-7588104140

CHANGE IN NAME

My (old name) is **SHARIF MOHAMMAD SHOAIB MOHAMMAD MUSTAK** which now I am, changing as (new name) **SHOYAB MUSTAK SHARIF**
Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.
Sign by
**SHOYAB MUSTAK SHARIF**
R/o Ashok nagar Bhokar Nanded-431801
M.No.-9156964786


## रेती वाहतूक करणारा हायवा पोलीसांनी पकडला

नांदेड/प्रतिनिधी-अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा विमानतळ पोलीसांनी गुरुवारी दुपारी जयमल्हार चौकात पकडला आहे. हायवा क्र.एमएच २६-बी.ई.-२७१७ या वाहनात पाच ब्रास रेती टाकुन विक्रीसाठी घेवून जात असतांना विमानतळ पोलीसांनी गुरुवारी दुपारी शहरातील जय मल्हार चौकात पकडला. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात राहुल गोविंद जाधव व पुंडलिक सोनटक्के या दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोट्यवधींचा बंधारा कोरडा;ईसापुर धरणाचे पाणी शेवटपर्यंत नाही



उमरखेड/प्रतिनिधी- उमरखेड तालुक्यातील पैनगंगा नदीकाठच्या गावांवर यंदाही भीषण पाणीटंचाईचे सावट दाटले असून कोट्यवधीचा खर्च होऊनही मुरलीजवळील नदीवर बांधलेला बंधारा मात्र कोरडा ठणठणीत आहे.

नदी गावालगत असूनही गावकरी मात्र तहानेने व्याकुळ झालेले आहेत. कोरड्या पैनगंगा पात्रामुळे गुरा ढोरांचीही तडफड होत असल्याचे चित्र समोर येत आहे. या विपरीत परिस्थितीमुळे गावकऱ्यांचे डोळे मात्र वर्षानुवर्षे पाण्याने डब डबलेलेच आहेत. उशाला नदी असूनही विदारक करणारी अशी परिस्थिती गावकऱ्यांची निर्माण झाली आहे. एकेकाळी बारमाही वाहणारी प्रति गंगामाय सर्वांची जीवनदायिनी पैनगंगा आज पूर्णपणे कोरडी पडली आहे. ज्या नदीने पिढ्यानपिढ्या गावांची तहान भागवली, तीच नदी आता वाळवंटासारखी ओसाड झालेली पाहून नागरिकांच्या डोळ्यांत पाणी तरळत आहेत.

सहस्त्रकुंड धबधब्यापासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर मुरली गावालगत २००६ साली माजी जिल्हा परिषद सदस्य भिकू जाधव यांच्या पुढाकाराने सुमारे दोन कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेला बंधारा आज पूर्णतः कोरडा आहे. या बंधाऱ्यात पाण्याचा नावालाही एक थेंबही नसल्याने शासनाच्या कामांबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ईसापुर धरणातून सोडले जाणारे पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचत नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिकट बनत आहे.

लिंगी, देवरंगा, मंगरूळ, वाळकी, परोटी, इस्लापूर, मुरली आणि मुरली तांडा यांसह अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी अक्षरशः भटकंती सुरू आहे. महिलांना हंडाभर पाण्यासाठी मैलोनमैल पायी चालावे लागत आहे. कोरड्या पडलेल्या नदीपात्रात ठिकठिकाणी खड्डे खोदून, ओलसर मातीतून थेंबथेंब पाणी गोळा करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. त्या प्रत्येक थेंबामागे त्यांची झुंज, त्यांचा संघर्ष आणि जगण्याची धडपड दडलेली आहे.या भागात पैनगंगा अभयारण्य असल्याने वन्य प्राण्यांचीही अवस्था अशीच दयनीय झाली आहे. जंगलातील पाणवठे कोरडे पडल्यामुळे जंगली प्राणी तहानेने व्याकुळ होऊन मानवी वस्त्यांकडे धाव घेत आहेत. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्षाची भीती वाढली असून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. दुसरीकडे, जनावरांसाठी पाणी नसल्याने शेतकरीही हवालदिल झाले आहेत. दरवर्षी उन्हाळ्याच्या झळा बसताच ही समस्या उग्र रूप धारण करते, मात्र ठोस आणि दीर्घकालीन उपाययोजना अद्यापही दिसून येत नाहीत. प्रशासनाचे प्रयत्न

> पैनगंगा नदी जवळ असूनही आम्हाला पाण्यासाठी भटकंती करावी लागते, ही मोठी शोकांतिका आहे. पुरुष, महिला आणि लहान मुलांनाही पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. जंगलातील वन्य प्राणी व जनावरं तहानेने तडफडत आहेत. शासनाने तात्काळ ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा परिसरातील सर्व गावांतील नागरिक तीव्र आंदोलन छेडतील.
>
> **- युवराज जाधव**
> मुरली, तालुका उमरखेड

अपुरे ठरत असून परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे चित्र आहे. आज गरज आहे ती पैनगंगा नदीच्या पुनरुज्जीवनाची, जलसंधारणाच्या प्रभावी उपायांची आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची. अन्यथा, ही तहान फक्त पाण्याची राहणार नाही, तर ती जगण्याची लढाई बनणार आहे. या सर्व बाबींकडे लोकप्रतिनिधींची डोळेझाक होत असून या विभागातील खासदार, आमदार, माजी आमदार तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचे या गंभीर प्रश्नाकडे स्पष्ट दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. पैनगंगा नदी अगदी जवळ असतानाही पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागणे ही अत्यंत वेदनादायक व शोकांतिका ठरत आहे.




कामगार दिनानिमित्त भाजप युवा मोर्चाच्यावतीने सफाई कामगारांचा मिठाई देवून सत्कार करण्यात आला. यावेळी महानगराध्यक्ष माजी आ.अमरनाथ राजूरकर, प्रविण साले, विजय येवनकर, शशिकांत क्षीरसागर, ओम बंडेवार, करण चव्हाण, प्रियेश ठाकूर, शिवा लोट, शुभम महाजन, अध्ययन तेहरा, युवराज शिंदे, जयेश कुलकर्णी व इतर उपस्थित होते.

# महाऑनलाईन पोर्टलचा बोजवारा; चार दिवसापासून साईट बंद

देगलूर/प्रतिनिधी-शासकीय कामासाठी अत्यंत आवश्यक असलेले महाऑनलाईन पोर्टल गेल्या चार दिवसापासून तांत्रिक कारणास्तव ठप्प पडले आहे. यामुळे देगलूर तहसील कार्यालयामार्फत मिळणारे उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, रहिवासी आणि इतर महत्त्वाच्या कागदपत्रांची कामे पूर्णपणे खोळंबली आहेत.

ऐन गरजेच्या वेळी पोर्टल बंद असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करत हेलपाटे मारावे लागत असून मोठी गैरसोय होत आहे. विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आणि शैक्षणिक कामासाठी सध्या उत्पन्न प्रमाणपत्राची मोठी गरज आहे. यासाठी शेकडो नागरिकांनी सेतू केंद्र आणि महा-ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज केले आहेत. मात्र सर्वर डाऊन असल्याने हे अर्ज तहसील प्रशासनाकडे पोहोचू शकत नाहीत. व त्यावर प्रक्रिया होत नाही. उत्पन्नाचा दाखला, रहिवासी, जातीची प्रमाणपत्र आणि इतर आवश्यक्य दाखले मिळणे बंद झाले आहे. ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या नागरिकांना काम होत नसल्याने वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाया जात आहेत. पोर्टल बंद असल्यामुळे अर्जाचा डोंगर साचला असून साईट सुरू झाल्यावर ही कामाचा ताण वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.महाऑनलाईनची साईट ही राज्यस्तरावरून हाताळली जात असल्याने स्थानिक प्रशासनाचे हाल बांधलेले आहेत. तरीही हे तांत्रिक अडचण तातडीने सोडून पोर्टल पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी देगलूर तालुक्यातील जनतेने केली आहे. आता हे पोर्टल नेमके कधी कार्यान्वित होते. याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. नागरिकांना काम होत नसल्याने वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा वाया जात आहे पोर्टल बंद असल्यामुळे अर्जाचा डोंगर साचला असून साईट सुरू झाल्यानंतरही कामाचा ताण वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या चार दिवसापासून आम्ही दाखल्यासाठी चकरा मारत आहोत.पण साईट बंद आहे एवढेच उत्तर मिळते ही तांत्रिक अडचण कधी दूर होणार?,असा असेल तर सवाल देगलूर शहर व तालुक्यातील नागरिक उपस्थित करत आहेत.

# नीट परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-नीट-यूजी-२०२६ प्रथम सामाईक प्रवेश परीक्षा रविवार ३ मे २०२६ रोजी दुपारी २ ते ५ या कालावधीत जिल्ह्यातील विविध ४६ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या केंद्रापासून शंभर मिटरच्या परिसरात ३ मे रोजी सकाळी ८ ते सायं ६ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी याबाबतचा आदेश १ मे रोजी निर्गमीत केला आहे.

या परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप आदी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मीटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय.एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

## उद्या बुद्ध पहाट कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती निमित्त बुद्ध पहाट या सांस्कृतिक कार्यक्रमास वैभव खुने, 'मी होणार सुपरस्टार गायीका' प्रांजल बोधक, 'सारेगमपा'फेम गायीका अंजली गडपाळे यांचे सुमधूर स्वर गुंजणार आहेत. शहरातील डॉ.शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात उद्या दि.२ मे रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल ॲण्ड कल्चरल मुहमेंटच्यावतीने निर्मिता व संयोजक, संगितकार प्रमोदकुमार गजभारे प्रस्तुत बुद्ध पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# मुंबईत १७४५ कोटी रुपयांचे कोकेन जप्त

मुंबई/प्रतिनिधी-देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत कोकेनचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. एका गुप्त माहितीच्या आधारे, नार्कोटिक्स कँट्रोल ब्युरोच्या (एनसीबी) पथकाने ३४९ किलोग्रॅम कोकेनचा हा साठा जप्त केला. एका अंदाजानुसार, एनसीबीने जप्त केलेल्या कोकेनचे बाजारमूल्य अंदाजे १७४५ कोटी रुपये आहे. ड्रग्जच्या या मोठ्या साठ्याचा स्रोत, ते कोणी आणले आणि ते कोठे पाठवले जाणार होते, याचा सध्या तपास सुरू आहे. महत्त्वाची बाब म्हणजे एनसीबीने केलेल्या मोठ्या कारवाईची माहिती खुद्द केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी दिली आहे. नार्कोटिक्स कँट्रोल ब्युरो अर्थात एनसीबीने केलेल्या या धडक कारवाईची दखल थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतली. त्यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील त्यांच्या अधिकृत अकाउंटवरून याबाबतची माहिती देत आणि एनसीबीच्या पथकाचे अभिनंदन करत म्हटले की, आम्ही अमली पदार्थांच्या टोळीला चिरडून टाकण्याचा निर्धार केला आहे. नार्कोटिक्स ब्युरोने मुंबईत १७४५ कोटी रुपये किमतीचे ३४९ किलो उच्च प्रतीचे कोकेन जप्त करून एका मोठ्या आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ टोळीवर कारवाई केली आहे. हे तळापासून वरपर्यंत या दृष्टिकोनाचे एक पथदर्शी उदाहरण आहे, जिथे एजन्सीने एका लहान पुराव्यातून माग काढून एका मोठ्या नेटवर्कला जाळ्यात पकडले. या अभूतपूर्व यशाबद्दल गृहमंत्री अमित शहा यांनी एनसीबी टीमचे अभिनंदन केले आहे.

पान १ वरुन

## जिल्ह्यातील सर्व घटकांच्या...


पालकमंत्री अतुल सावे यांनी संचलन करणाऱ्या पथकाचे पोलीस वाहनातून निरीक्षक केले. परेड कमांडर वैभव पडवळ, सेंकड इन कमांडर विजय कुमार धोंडगे यांच्या नेतृत्वाखाली पथसंचलनात जलद प्रतिसाद दल, सशस्त्र पोलीस पुरुष पथक, सशस्त्र महिला पोलीस पथक, गृहरक्षक दलाचे पुरूष व महिला पथक, गृहरक्षक दल पुरुष पथक, राष्ट्रीय छात्रसेना, अग्नीशमन दलाचे पथक, पोलीस वाद्य पथक, डॉग स्काड युनिट, बॉम्ब शोधक व नाशक पथक, सर्व्हिलेन्स वाहन, फोरेसिक वाहन, रुग्णवाहिका १०८, अग्निशामक वाहन देवदूत यांचा पथसंचलनात सहभाग होता.

## पिक विमा तात्काळ द्या;...

दाव्यांची सखोल तपासणी करावी, तसेच पिक विमा योजनेत फळपिकांचा समावेश करून पूरग्रस्त भागांना दिलासा द्यावा, अशी मागणीही समितीने केली आहे. वरील सर्व मागण्या तातडीने मान्य करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जिल्हा शेतकरी जनआंदोलन संघर्ष समितीने दिला आहे. या निवेदनावर व्यंकटराव जाधव, नारायण पवार आणि डॉ. भगवान मनूरकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## माहूर तालुक्यातील...

शाळांवर ७ दिवसांत कारवाई करून अपूर्णता असल्यास त्या शाळा बंद करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे जनहित याचिका दाखल करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. याशिवाय, सर्व शाळांनी शैक्षणिक शुल्क, गणवेश शुल्क व इतर आकारणीबाबत माहितीफलक लावावेत, जेणेकरून पालकांची फसवणूक होणार नाही, अशी मागणीही करण्यात आली आहे. विशेषतः आदिवासी व पेसा क्षेत्रातील नागरिकांची आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी प्रशासनाने लक्ष घालावे, असे निवेदनात नमूद आहे.



हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४